# Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik – 422 222

**International Women's Day 2020**







On the occasion of International Women's Day, Savitribai Phule Adhyasana organized a recitation of the famous play 'Gadhivarchya pori'.

# Yashwantrao Chavan Maharashtra Open University,
# Nashik – 422 222

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

ज्ञानगंगोत्री परिसर, गंगापूर धरणाजवळ, नाशिक ४२२ २२२

जावक क्र. यचममुवि/कुका- २०२०/
दिनांक :- ०६ / ०३ / २०२०

## परिपत्रक

मराठी राजभाषा दिन सप्ताहाच्या पार्श्वभूमीवर आणि जागतिक महिला दिनानिमित्ताने आपल्या विद्यापीठात सावित्रीबाई फुले अध्यासनाच्या वतीने **"गढीवरच्या पोरी"** ( लेखक श्री. दत्ता पाटील व दिग्दर्शक सचिन शिंदे ) या गाजलेल्या नाटकाच्या अभिवाचनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. सदर **कार्यक्रम ९ मार्च २०२० रोजी सकाळी ११.०० वाजता शैक्षणिक सभागृहात** होणार आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. ई. वायुनंदन असतील. या कार्यक्रमाचा सर्व सहकाऱ्यांनी लाभ घ्यावा.

कुलसचिव

**प्रत :**

१. मा. कुलगुरू यांचे कार्यालय.
२. सर्व विद्याशाखा / विभाग मा. संचालक, विभाग प्रमुख / कक्ष प्रमुख यांना कळविण्यात येते की, सदर चे परिपत्रक आपल्या अधिनस्त सर्व संबंधित यांच्या (शिक्षक / अधिकारी/ कर्मचारी / पीएच.डी / बी.बी.ए. विद्यार्थी /आय.टी.आय. प्रशिक्षणार्थी) यांच्या निदर्शनास आणून कार्यक्रमास उपस्थित राहण्यास निर्देशित करावे, ही विनंती.

सर्वांनी नोंद घ्यावी
9/3/2020

**आस्थापना कक्ष**
जावक क्र.: ३१८
दिनांक : 06 | 03 | 2020

Scanned with CamScanner

# Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik – 422 222

पुढारी

# ‘गढीवरच्या पोरी’ नाटकाचे अभिवाचन

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात सावित्रीबाई फुले अध्यासनातर्फे ‘गढीवरच्या पोरी’ या नाटकाच्या अभिवाचनाने महिला दिन, मराठी भाषा सप्ताह साजरा करण्यात आला. दत्ता पाटील लिखित व सचिन शिंदे दिग्दर्शित या नाटकाचे अभिवाचन एकता आढाव, रुपश्री कुलकर्णी, शिवानी पाठक व प्राजक्ता प्रभाकर यांनी केले. प्रमुख अतिथी म्हणून कुलगुरू प्रा. ई. वायुनंदन उपस्थित होते. ‘गढीवरच्या पोरी’ या नाटकात आपापले गाव-शहर सोडून शिक्षणानिमित्त मुंबईत एकाच फ्लॅटमध्ये राहणाऱ्या व वेगवेगळ्या कौटुंबिक पार्श्वभूमीच्या व भिन्न भावविश्वातील पाच तरुणींची कथा आहे. मुलींशी संवादाचा मूल्यात्मक सेतू बांधू पाहणारा जीवनपट चारही तरुणींनी आपल्या अभिवाचनातून समर्थपणे उलगडून दाखविला. रोहित सरोदे यांनी नाटकास पार्श्वसंगीत दिले. कुलगुरू प्रा. ई. वायुनंदन यांनी महिला दिनानिमित्त विद्यापीठातर्फे महिलांसाठी चालविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांचीही माहिती त्यांनी दिली. सावित्रीबाई फुले अध्यासनाचे प्रमुख प्रा. प्रवीण घोडेस्वार यांनी प्रास्ताविक केले. माधुरी खर्जुल यांनी सूत्रसंचालन केले. यावेळी विद्यापीठातील विविध विद्याशाखांचे संचालक, अधिकारी, प्राध्यापक, विविध विषयांचे समन्वयक, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.



**नाशिक : मुक्त विद्यापीठात जागतिक महिला दिनानिमित्त ‘गढीवरच्या पोरी’ या नाटकाचे अभिवाचन करताना एकता आढाव, रूपश्री कुलकर्णी, शिवानी पाठक, प्राजक्ता प्रभाकर.**

My Nashik Edition
11 Mar, 2020 Page No. 3
Powered by : erelego.com

लोकमत



यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात महिला दिनानिमित्त सावित्रीबाई फुले अध्यासनातर्फे 'गढीवरच्या पोरी' या नाटकाचे अभिवाचन करताना एकता आढाव, रुपश्री कुलकर्णी, शिवानी पाठक व प्राजक्ता प्रभाकर.

# 'गढीवरच्या पोरी' नाटकाचे अभिवाचन

## मुक्त विद्यापीठात उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

**नाशिक :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात सावित्रीबाई फुले अध्यासनातर्फे महिला दिन व मराठी भाषा सप्ताह विद्यापीठातील 'गढीवरच्या पोरी' नाटकाच्या अभिवाचनाने साजरा करण्यात आला. नाटककार दत्ता पाटील लिखित व सचिन शिंदे दिग्दर्शित या नाटकाचे अभिवाचन एकता आढाव, रुपश्री कुलकर्णी, शिवानी पाठक व प्राजक्ता प्रभाकर यांनी केले. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. ई. वायुनंदन प्रमुख पाहुणे होते.

आपले गाव-शहर सोडून शिक्षणानिमित्त मुंबईत एकाच फ्लॅटमध्ये राहणाऱ्या व वेगवेगळ्या कौटुंबिक पार्श्वभूमीच्या व भिन्न भावविश्वातील पाच तरुण मुलींच्या कथेचे वर्णन करणारे 'गढीवरच्या पोरी' नाटक यावेळी सादर करण्यात आले.

तरुणी मोबाइलद्वारे त्यांच्या आप्तस्वकीयांशी क्रमश: बोलत जातात आणि त्यांच्या त्या बोलण्यातून दर्शकांसमोर त्यांच्या जीवनकहाणीचा पट उलगडत जातो. चारही तरुणींनी अभिवाचनातून हा जीवनपट समर्थपणे उलगडून दाखविला. रोहित सरोदे यांनी या नाटय अभिवाचनास पार्श्वसंगीत दिले. प्रा. प्रवीण घोडेस्वार यांनी प्रास्ताविक केले. माधुरी खर्जुल यांनी सूत्रसंचालन केले.